नामसंकीर्तनयोग : खंड १

# नामजपाचे महत्त्व आणि लाभ

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४३, इंग्रजी २०१, कन्नड १९६, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली २९, मल्ल्याळम् २३, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**ऑक्टोबर २०२३ पर्यंत ३६४ ग्रंथांच्या १३ भाषांत ९४ लाख ४६ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १८.१०.२०२३ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०४६ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

# पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका

### (काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**१. 'नामसंकीर्तनयोग'चा अर्थ** ९

**२. 'नामसंकीर्तन'चे समानार्थी शब्द (नामजप, नाम, नामस्मरण, इ.)** ९

**३. 'जप' या शब्दाचे अर्थ आणि प्रकार** ९

**४. नामजपाविषयीचे अपसमज (गैरसमज)** १०

**५. नामाची वैशिष्ट्ये** १०

५ आ. वेदांचे उत्पत्तीस्थान म्हणजे नाम १०

५ ई. नामाविषयीचे विकल्प नामानेच दूर होणे ११

५ ऊ. 'नाम घेणे' म्हणजे 'सर्वस्व देणे' ११

५ ऐ. नामाची 'मूर्ती लहान; पण कीर्ती महान' १२

५ ओ. नाम हे साधन आणि साध्य असे दोन्ही असणे १२

**६. नामजपातील तत्त्व** १२

६ अ. मायेची ओढ न्यून करण्यासाठी नामजप आवश्यक १२

६ आ. अनाम्याचा (ईश्वराचा) नामजप करण्याची आवश्यकता १२

**७. नामजपाचे महत्त्व** १३

७ इ. भगवंताच्या रूपापेक्षा त्याचे नाम महत्त्वाचे १५

७ उ. भगवंताच्या नामाने भगवंताप्रती प्रेम वाटणे १७

७ ऊ. सर्वांसाठी सुलभ अशी बंधनविरहित साधना १७

७ ए. नाम सदाचारी आणि पापी या सर्वांचे तारक असणे १९

७ औ. जीवन्मुक्तालाही नाम आवश्यक असणे २२

**८. नामजपाचे लाभ** २२

८ आ. शरीरशास्त्रदृष्ट्या लाभ २३

८ आ ५. नामजप हाच सर्व रोगांवरील उपचार ! २५

८ आ ६. वासना आणि दुःख संपण्यासाठी नामजप करा ! २५

८ इ. मानसशास्त्रदृष्ट्या लाभ २५

८ इ १. मनोविकारांवरील उपचार २६

८ इ ३. मनाची एकाग्रता वाढणे २६

८ ई. अध्यात्मशास्त्रदृष्ट्या लाभ २७

८ ई २. नामाने दुःख परिहार होण्याची कारणे २९

८ ई ४. नामजपाने कुंडलीतील द्वादश स्थानांची शुद्धी होणे ३०

८ अं. नामामुळे भगवंताशी एकरूप होता येणे / अद्वैत साधले जाणे ४४

८ क. नामामुळे मृत्यूनंतरही लाभ होणे ४४

**९. नामजप आणि इतर योगमार्ग यांची तुलना** ४६

**卐 नामजप, देवता आदींसंबंधातील काही टीका आणि त्यांचे खंडण** ६४

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ७०

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७४

## मनोगत

* एक तुझे नाम । शास्त्रांचा आधार ।
वेदांच्या जे पार । तत्त्व तुझे ॥

* कलियुगी धर्म हा कोसांतरी ।
नामचि तारेल भवसागरी ॥

यांसारख्या भजनपंक्तींद्वारे नामाचे महत्त्व आमचे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांनी वर्णिले आहे. संत तुकाराम, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, संत कबीर यांसारख्या संतांनीही नामाचे महत्त्व सांगितले आहे. असे असतांनाही लहानशा नामनौकेने अथांग भवसागर पार करून ईश्वरप्राप्ती कशी काय होऊ शकेल, असा शंकावजा विकल्प बऱ्याच जणांना असतो. नामाविना ईश्वराची अनुभूती येत नाही आणि बुद्धीने पटल्याविना नाम घेणे होत नाही, अशा विचित्र परिस्थितीमुळे बरेच जण नाम न घेताच 'नामात काही अर्थ नाही', असा निष्कर्ष काढतात. नामासंबंधीच्या सर्व शंका आणि विकल्प विराम पावावेत, तसेच भगवंताची सर्वश्रेष्ठ विभूती असलेल्या नामाचे असामान्यत्व लक्षात यावे, यांसाठी हा ग्रंथप्रपंच केला आहे. या ग्रंथात दिलेली विविध सूत्रे (मुद्दे), उदा. नाम म्हणजे वेदांचेही उत्पत्तीस्थान, नाम हे सदाचारी आणि पापी या सर्वांचे तारक, कोणत्याही साधनेतील पूर्णत्वासाठी नामच आवश्यक, जीवन्मुक्तासाठीही नाम आवश्यक, हे वाचून नामाविषयीची श्रद्धा वाढण्यास निश्चितच साहाय्य होईल.

नामजपामुळे शारीरिक आणि मानसिक विकार बरे होणे, दुःखांचा परिहार होणे, सर्व पापांचा नाश होणे, मृत्यूनंतरही लाभ होणे इत्यादी विविध स्तरांवर होणाऱ्या लाभांविषयी या ग्रंथात विवेचन केले आहे. ईश्वरप्राप्ती करून घेण्याचे कर्मयोग, भक्तीयोग, ध्यानयोग, ज्ञानयोग इत्यादी साधनामार्ग आहेत. दैनंदिन प्रपंचात व्यग्र असणाऱ्या सर्वसामान्य सांसारिकांना आचरण्यास सुलभ असा, शुचिर्भूतता, स्थळकाळ आदी बंधनविरहित असा अन् भगवंताशी सतत अनुसंधान साधून देईल, अर्थात साधना अखंड चालू राहील असा एकमेव साधनामार्ग म्हणजे नामयोग कसा, हेही या ग्रंथावरून

लक्षात येईल. यावरून ‘मूर्ती लहान; पण कीर्ती महान’ अशी ‘नामसाधना’ प्रत्येकानेच करणे का आवश्यक आहे, हे लक्षात येईल. या ग्रंथात दिलेले नामाचे महत्त्व लक्षात घेऊन आपण स्वतः नामसाधना चालू करावी, असे वाचकांना वाटो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

सनातनच्या ‘अध्यात्मशास्त्र’ विषयीच्या ग्रंथांचे सामाईक मनोगत ‘धर्माचे मूलभूत विवेचन’ या ग्रंथात दिले आहे.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या ‘सच्चिदानंद परब्रह्म’ या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये ‘प.पू.’ आणि ‘परात्पर गुरु’ या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## सनातनच्या दोन सद्गुरूंच्या नावांच्या आधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’ असे संबोधले जात आहे. या संतद्वयी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत.

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या (मुद्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.